# जाहिरात

## मुंबई पोलीस भरती सन – २००९

जाहिरात क्रमांक : ०१/२०१० ठिकाण : मुंबई दिनांक: ०१/०२/२०१०

### १. रिक्त पदे व भरतीची तारीख

१.१ मुंबई पोलीस दलात पोलीस शिपाई पदाची खाली दर्शविल्याप्रमाणे प्रवर्गनिहाय रिक्त पदे भरण्यासाठी सोमवार दिनांक ०८/०३/२०१० रोजी भरती आयोजित करण्यात आली आहे.

| पद | प्रवर्ग | | | | | | | | | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | अजा | अज | विमाप्र | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | इमाव | खुला | |
| पोलीस शिपाई | ४२१ | २२७ | ६५ | ९७ | ८१ | ११४ | ६५ | ६१६ | १५५६ | ३२४२ |

**टिप :–**

अ) उपरोक्त पदांमध्ये पोलीस शिपाई चालकांची पदेसुद्धा अंतर्भूत आहेत.

ब) एकाच भरती प्रक्रियेमधून पोलीस शिपाई पदी / पोलीस शिपाई चालक पदी नियुक्ती केली जाईल. जर एखाद्या उमेदवाराने पोलीस शिपाई चालक पदी नियुक्ती नाकारली तर त्याचा कुठल्याही पदासाठी (पोलीस शिपाई/पोलीस शिपाई चालक) नियुक्तीचा हक्क राहणार नाही.

क) महिला, खेळाडू, माजी सैनिक, गृहरक्षक, प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त, भूकंपग्रस्त यांच्याकरिता असलेले आरक्षण 'समांतर आरक्षण' असून ते 'सामाजिक आरक्षणांतर्गत' समाविष्ट आहे. (महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्रमांक एसआरव्ही–१०९७/प्र. क्र.३१/९८/१६–अ, दि.१६/०३/१९९९ पहावे )

ड) समांतर आरक्षण प्रवर्गाचा लाभ केवळ एकाच समांतर आरक्षण प्रवर्गासाठी अनुज्ञेय राहिल.

इ) वर दर्शविलेली पदसंख्या व आरक्षणात बदल होण्याची शक्यता असू शकते. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार सक्षम प्राधिकाऱ्यास राहतील. **सदरची पदे मागील अनुशेष विचारात घेवून दर्शविण्यात आलेली आहेत.**

१.२ **उमेदवारांना या कार्यालयामार्फत विहीत करण्यात आलेले "आवेदन अर्ज" दिनांक ०८/०२/२०१० ते दिनांक ०५/०३/२०१० पर्यंत खालील नमूद ठिकाणी उपलब्ध करून दिले जातील. अर्ज मिळण्याचा शेवटचा दिनांक ०५/०३/२०१० आणि वेळ १७.३० वाजेपर्यंत राहिल. (सायंकाळी ०५.३० वा. पर्यतच)**

**ठिकाणांची नावे (वेळ सकाळी ०८.०० ते सायंकाळी ०५.३० वाजेपर्यंत) :–**

१) सशस्त्र पोलीस, नायगाव मुख्यालय, जी.डी.आंबेकर मार्ग, दादर (पूर्व), मुंबई – १४.

२) सशस्त्र पोलीस, ताडदेव मुख्यालय, गंगा जमुना सिनेमाच्या बाजूला, ताडदेव, मुंबई – ३४.

३) सशस्त्र पोलीस, वरळी मुख्यालय, सर पोचखानवाला रोड, वरळी पोलीस कॅम्प, मुंबई–२५.

४) आझाद मैदान पोलीस ठाणे, मुंबई, ५) मरिन लाईन्स पोलीस ठाणे, मुंबई,

६) कुर्ला पोलीस ठाणे, मुंबई, ७) मुलुंड पोलीस ठाणे, मुंबई,

८) अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई, ९) बोरिवली पोलीस ठाणे, मुंबई

१.३ सर्व अटींची व आवश्यक त्या सर्व प्रमाणपत्रांची पूर्तता करणारे उमेदवार सदर पदासाठी अर्ज करण्यास पात्र राहतील.

१.४ उमेदवाराने **''पोलीस आयुक्त, मुंबई''** **(COMMISSIONER OF POLICE , MUMBAI)** या नावाने काढलेली रू ५०/— (रूपये पन्नास फक्त) ची **इंडियन पोस्टल ऑर्डर** किंवा **डिमांड ड्राफ्ट** परिच्छेद क्रमांक १.२ मध्ये नमूद केलेल्या ठिकाणी जमा केल्यानंतर त्यांना विहीत नमुन्यातील आवेदन अर्ज देण्यात येतील. मुंबई शहरातील बँकातून घेतलेल्या **'पे—ऑर्डर्स्'** देखील स्विकारण्यात येतील. 'डिमांड ड्राफ्ट' अथवा 'पे—ऑर्डर्स्' **"Payable at Mumbai"** असणे आवश्यक आहेत.

१.५ विहीत नमुन्यातील आवेदन अर्ज उमेदवाराने स्वहस्ताक्षरात भरावेत व परिच्छेद क्रमांक १३ मध्ये नमूद केलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह (Attested Copies) आवेदन अर्ज, **आवेदन अर्जाच्या पहिल्या पानावरील उजव्या कोपऱ्यात नमूद करण्यात आलेल्या ठिकाणी दिनांक ०८/०३/२०१० रोजी सकाळी ०८.०० ते दुपारी १२.०० वाजेपर्यत उमेदवाराने व्यक्तिश: सादर करावेत. व्यक्तिश: येणाऱ्या उमेदवारांनाच प्रवेश दिला जाईल व त्यांचे अर्ज स्विकारण्यात येतील. पोस्टाने / कुरियरने पाठविलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्विकारले जाणार नाहीत. अर्ज स्विकारण्यात आल्यानंतर उमेदवाराचा आवेदन अर्ज ज्या क्रमाकांचा असेल त्याच क्रमांकाचे विहीत नमुन्यातील ओळखपत्र देण्यात येईल. हे ओळखपत्र घेतल्याशिवाय उमेदवाराने त्यांची जागा सोडू नये. सदर ओळखपत्र भरती प्रक्रियेच्या प्रत्येक टप्प्यावर आवश्यक राहिल.**

१.६ **दुपारी १२.०० वाजल्यानंतर आलेल्या उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही व त्यांचे आवेदन अर्ज स्विकारले जाणार नाहीत.**

१.७ अर्ज सादर करण्याच्या वेळी उमेदवारास देण्यात येणारे विहीत नमुन्यातील ओळखपत्र (फोटोसह) भरती प्रक्रियेच्यावेळी प्रत्येक टप्प्यावर उमेदवाराने स्वत:सोबत ठेवणे आवश्यक आहे. विहीत ओळखपत्राशिवाय उमेदवारास भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावरील चाचणीस प्रवेश दिला जाणार नाही. सदर ओळखपत्र हरवणार नाही अथवा फाटणार नाही, याची प्रत्येक उमेदवाराने दक्षता घ्यावी.

१.८ **मुंबई शहर व उपनगर या रोजगार व स्वयंरोजगार सेवायोजन कार्यालयात नाव नोंदविलेल्या उमेदवारांनी, ते या जाहिरातीत नमूद केलेल्या आवश्यक त्या अटींची व प्रमाणपत्रांची पूर्तता करीत असल्यास, परिच्छेद क्रमांक १.२ मध्ये नमूद ठिकाणांहून अर्ज विकत घ्यावेत. मात्र त्यांनी त्याबाबतची माहिती संबंधित रोजगार व स्वयंरोजगार सेवायोजन कार्यालयास कळवावी.**

1.9 **उमेदवाराने एका पदासाठी एकावेळी केवळ एकच आवेदन अर्ज सादर करावयाचा आहे. एकाच पदासाठी एकापेक्षा जास्त अर्ज केल्याचे भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर आढळून आल्यास सदर उमेदवाराचे सर्व अर्ज बाद ठरवून त्यास भरती प्रक्रियेतून अपात्र ठरविण्यात येईल. याबाबत त्यांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

1.10 **अपूर्ण असलेले तसेच आवश्यक असलेल्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती न जोडलेले अर्ज स्विकारण्यात येणार नाहीत.**

## २. वेतनश्रेणी :

२.१ पोलीस शिपाई पदाची वेतनश्रेणी पी.बी.१ वेतनबँड मधील रू. **५२०० — २०२००/— + ग्रेड पे रू.२००० या वेतनश्रेणीत प्रारंभिक वेतन रू.६४६०/— + ग्रेड पे रू.२०००/— + नियमानुसार भत्ते, अशी राहिल.**

२.२ नियुक्तीस पात्र ठरणाऱ्या पोलीस शिपाई यांना शासन निर्णय क्रमांक अं. नि. ओ.१००५५/१२६/सेवा—४, दि.३१/१०/२००५ अन्वये "परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना" लागू ठरेल.

**३. वयोमर्यादा** : उमेदवाराचे वय दिनांक २८/०२/२०१० रोजी १८ वर्षे पूर्ण असावे आणि २५ वर्षापेक्षा अधिक नसावे. मागासवर्गीयांना नियमानुसार ५ वर्षे शिथिलक्षम.

## ४. शैक्षणिक अर्हता :—

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम ४१) अन्वये प्रस्थापित केलेल्या विभागीय मंडळाकडून घेण्यात येणारी उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी उत्तीर्ण ) किंवा शासनाने या परिक्षेस समकक्ष **(राष्ट्रीय मुक्त विद्यालय, नवी दिल्ली यांची सिनीयर सेकेंडरी स्कूल परिक्षा तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाची पदवी परिक्षा, सीबीएसई बारावी परिक्षा हया राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या १२ वी इयत्तेच्या परीक्षेशी समकक्ष आहेत)** घोषित केलेली परिक्षा उत्तीर्ण असणे आवश्यक आहे.

## ५. शारिरीक पात्रता :

**महिला :— किमान उंची** : १५५ से.मी.

**पुरूष :— किमान उंची** : १६५ से.मी.

**छाती** : न फुगवता किमान ७९ से.मी. (न फुगविलेली छाती व फुगविलेली छाती यातील फरक ५ से.मी. पेक्षा कमी नसावा)

## ६. शारिरीक मोजमाप व कागदपत्रांची पडताळणी :—

६.१ आवेदन अर्ज सादर करतेवेळी प्रत्येक उमेदवारास विहीत नमुन्यातील ओळखपत्र देण्यात येईल. या ओळखपत्रावर नमूद असलेल्या दिनांक, वेळ व ठिकाणी उमेदवारास शारिरीक मोजमाप व कागदपत्रांच्या पडताळणीसाठी स्वखर्चाने हजर रहावे लागेल. त्यावेळी त्याला ओळखपत्रावर स्वत:चा फोटो चिकटवून व त्यावर त्याची स्वत:ची स्वाक्षरी करून आणि परिच्छेद क्रमांक १३ मध्ये नमूद सर्व प्रमाणपत्रांच्या मूळ व साक्षांकित (attested) प्रतीसह वेळेवर हजर रहावे लागेल. **ओळखपत्र नसल्यास कागदपत्र पडताळणीच्या ठिकाणी प्रवेश दिला जाणार नाही.** शारिरीक मोजमापात पात्र ठरणाऱ्या उमेदवारांच्याच कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल.

६.२ कागदपत्र पडताळणीच्या वेळी, उमेदवाराने सादर केलेल्या अर्जातील माहिती अपूर्ण आढळल्यास किंवा चूकीची आढळल्यास सदर अर्ज बाद करण्यात येईल.

६.३ कागदपत्र पडताळणीच्या वेळी उमेदवारांनी परिच्छेद क्रमांक १३ मध्ये नमूद केलेली मूळ (Original) प्रमाणपत्रे दाखवणे बंधनकारक आहे. मूळ प्रमाणपत्रे उपलब्ध नसल्यास उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल. **सर्व संबंधीत प्रमाणपत्रे, भरती दिनांकापूर्वीची म्हणजेच दिनांक ०८/०३/२०१० पूर्वीची असावीत. त्यानंतरच्या तारखांची प्रमाणपत्रे कोणत्याही परिस्थितीत स्विकारण्यात येणार नाहीत.** तसेच मूळ प्रमाणपत्रे संशयास्पद अथवा बोगस असल्याचे आढळल्यास सदर उमेदवार कायदेशीर कारवाईस पात्र राहिल.

६.४ अधिवास, नॉन क्रिमीलेअर, जात प्रमाणपत्रासाठी सक्षम प्राधिकरणाने दिलेल्या पावत्या स्विकारल्या जाणार नाहीत. **केवळ मूळ प्रमाणपत्रे ग्राह्य धरण्यात येतील व त्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती (attested copies) स्विकारण्यात येतील.**

६.५ **उमेदवारास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक डीएमसी — १०८७/९६९८/६०८—३२, दिनांक ०१/०३/१९८९ अन्वये विहीत केलेल्या नमुन्यातील 'वय, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र ( Certificate of Age, Nationality & Domicile )' सादर करावे लागेल. अन्य कोणत्याही नमुन्यातील प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.** तसेच उमेदवाराकडे शासनाने विहीत केलेल्या नमुन्यातील (सोबत नमुना जोडला आहे) अधिवास प्रमाणपत्र नसल्यास त्याला भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल. याबाबत त्याचे कोणतेही अभिवेदन स्विकारले जाणार नाही.

६.६ विमुक्त जाती /भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या मागास प्रवर्गातील उमेदवारांना जात प्रमाणपत्रांसह दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२००९ या कालावधीचे (म्हणजेच दिनांक ०१/०४/२००९ व त्यानंतर दिलेले ) विहीत नमुन्यातील **'नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र'** सादर करावे लागेल. ( दिनांक ०१/०४/२००९ ते दिनांक ३१/०३/२०१० या वित्तीय वर्षासाठी भरतीच्या तारखेच्या पूर्वीचे म्हणजेच दिनांक ०८/०३/२०१० पूर्वी दिलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर केल्यास ते सुद्धा ग्राह्य धरण्यात येईल ) **वर नमूद मागास प्रवर्गातील जो उमेदवार नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करणार नाही व तो खुल्या प्रवर्गासाठी विहीत केलेल्या वयोमर्यादेत बसणार नाही, त्याला या भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल.** मात्र असा उमेदवार खुल्या प्रवर्गासाठी विहीत केलेल्या वयोमर्यादेत बसत असल्यास त्याचा विचार केवळ खुल्या प्रवर्गातून भरती प्रक्रियेसाठी करण्यात येईल. त्यासाठी त्याला खुल्या प्रवर्गात समावेश करून घेण्याबाबतचे संमतीपत्र द्यावे लागेल. असे संमतीपत्र भरून न देणाऱ्या उमेदवारांस भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

६.७ अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती या प्रवर्गातील उमेदवारांना नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र सादर करण्याची आवश्यकता नाही. मात्र त्यांना त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. अन्यथा त्यांचा विचार सदर प्रवर्गातून करण्यात येणार नाही. मात्र ते खुल्या प्रवर्गासाठी विहीत

केलेल्या वयोमर्यादेत बसत असल्यास त्याचा विचार खुल्या प्रवर्गातून भरती प्रक्रियेसाठी करण्यात येईल. त्यासाठी त्याला खुल्या प्रवर्गात समावेश करून घेण्याबाबतचे संमतीपत्र द्यावे लागेल. असे संमतीपत्र भरून देण्यास इच्छुक नसलेल्या उमेदवारास अपात्र ठरविण्यात येईल.

६.८ महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ—२०००/प्र.क्र.४१५/का—२, दि.२५/५/२००१ अनुसार विमुक्त जाती/भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग या प्रवर्गातील (अनुसूचीत जाती व अनुसूचीत जमाती वगळून) उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना महिलांचे ३०% आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. यास्तव सदर प्रवर्गातील महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ मिळण्यासाठी दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२००९ या कालावधीचे (म्हणजेच दिनांक ०१/०४/२००९ व त्यानंतर दिलेले) विहीत नमुन्यातील 'नॉन क्रिमीलेयर प्रमाणपत्र' सादर करणे बंधनकारक आहे. ( दिनांक ०१/०४/२००९ ते दिनांक ३१/०३/२०१० या वित्तीय वर्षासाठी भरतीच्या तारखेच्या पूर्वीचे म्हणजेच दिनांक ०८/०३/२०१० पूर्वी दिलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर केल्यास ते सुद्धा ग्राहय धरण्यात येईल. ) अन्यथा त्यांचा सदर प्रवर्गातून महिलांसाठी आरक्षित पदावर विचार केला जाणार नाही. मात्र अशी महिला उमेदवार खुल्या प्रवर्गासाठी विहीत केलेल्या वयोमर्यादेत बसत असल्यास खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवार म्हणून (पुरूष उमेदवाराप्रमाणे) विचार करण्यात येईल. मात्र त्यासाठी तिला तसे संमतीपत्र द्यावे लागेल. असे संमतीपत्र देण्यास इच्छुक नसलेल्या महिला उमेदवारास भरती प्रक्रियेसाठी अपात्र ठरविण्यात येईल.

६.९ खुल्या प्रवर्गातील महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत आाणि प्रगत व्यक्ती / गटातील (क्रिमीलेअर) / कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही. यास्तव खुल्या प्रवर्गातील ज्या महिला उमेदवार दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२००९ या कालावधीचे (म्हणजेच दिनांक ०१/०४/२००९ व त्यानंतर दिलेले ) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करतील, त्यांना या प्रवर्गातील महिलांसाठी असलेल्या ३० टक्के आरक्षणाचा फायदा देय होईल. (दिनांक ०१/०४/२००९ ते दिनांक ३१/०३/२०१० या वित्तीय वर्षासाठी भरतीच्या तारखेच्या पूर्वीचे म्हणजेच दिनांक ०८/०३/२०१० पूर्वी दिलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर केल्यास ते सुद्धा ग्राहय धरण्यात येईल. ) ( सोबत खुल्या प्रवर्गातील महिलांनी द्य ावयाच्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राचा नमुना जोडला आहे. ) ज्या महिला उमेदवार असे प्रमाणपत्र सादर करणार नाहीत त्यांचा विचार खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारण उमेदवार (पुरूष उमेदवाराप्रमाणे) म्हणून करण्यात येईल. त्यासाठी त्यांना तसे संमतीपत्र द्यावे लागेल. असे संमतीपत्र न देणाऱ्या महिला उमेदवारांना पुढील भरती प्रक्रियेसाठी अपात्र करण्यात येईल.

६.१० खुल्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवारासही दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२००९ या कालावधीचे (म्हणजेच दिनांक ०१/०४/२००९ व त्यानंतर दिलेले) नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर करावे लागेल. (दिनांक ०१/०४/२००९ ते ३१/०३/२०१० या वित्तीय वर्षासाठी

भरतीच्या तारखेच्या पूर्वीचे म्हणजेच दिनांक ०८/०३/२०१० पूर्वी दिलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर केल्यास ते सुद्धा ग्राह्य धरण्यात येईल ). अन्यथा त्याचा विचार खुल्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवार म्हणून न करता सर्वसाधारण उमेदवार म्हणून करण्यात येईल व तसे संमतीपत्र त्याला द्यावे लागेल. खुल्या प्रवर्गातील खेळाडू उमेदवारांसाठी आवश्यक असलेल्या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राचा नमुना यासोबत प्रसिध्द करण्यात येत आहे.

६.११ एखादा उमेदवार त्याच्याकडे संबंधित प्रमाणपत्रे नसतानाही अनावधनाने भरतीसाठी पात्र ठरवला गेला व ही बाब भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अथवा सदर पदावर नेमणूक झाल्यानंतरही निदर्शनास आल्यास, सदर उमेदवाराची उमेदवारी / नेमणूक रद्द ठरविण्यात येईल. याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही. यासाठी विहीत केलेली सर्व कागदपत्रे/ प्रमाणपत्रे भरतीच्यावेळी सादर करण्याची उमेदवाराने स्वत: दक्षता घेणे आवश्यक आहे.

## ७. विविध चाचण्या :

**7.1** शारिरीक पात्रता पूर्ण करणाऱ्या उमेदवारांची १०० गुणांची मैदानी चाचणी, ७५ गुणांची लेखी चाचणी आणि २५ गुणांची मुलाखत चाचणी घेण्यात येईल.

**7.2** मैदानी चाचणीमध्ये कमीत कमी ५० टक्के गुण मिळवून १ : १५ ( जाहिरातीत नमूद केलेल्या एकूण रिक्त पदांच्या ) या प्रमाणकांत बसणाऱ्या त्या – त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार आलेल्या आणि सदरच्या प्रमाणकानुसार शेवटच्या उमेदवारास जितके गुण मिळालेले आहेत तितके समान गुण मिळविणाऱ्या सर्व उमेदवारांना लेखी परिक्षेस बोलाविण्यात येईल. तसेच लेखी परिक्षेमध्ये कमीत कमी ३८ गुण मिळविणाऱ्या आणि मैदानी व लेखी चाचणीतील गुणांच्या एकत्रिकरणानंतर गुणवत्ता क्रमानुसार प्रसिध्द केलेल्या प्रवर्गनिहाय पद संख्येच्या १ : ८ या प्रवर्गनिहाय प्रमाणात उमेदवारांना मुलाखत चाचणीस बोलाविण्यात येईल. उमेदवारांच्या मैदानी, लेखी व मुलाखत चाचणीचे गुण एकत्रित करून अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

### ७.३ मैदानी चाचणी खालील प्रमाणे राहील:

**पुरूष :** (१) १०० मीटर्स धावणे, (२) ८०० मीटर्स धावणे, (३) १० पुल अप्स,
(४) लांब उडी, (५) गोळा फेक

**महिला :** (१) २०० मीटर्स धावणे (२) ३ कि.मी. चालणे (३) लांब उडी
(४) गोळा फेक (४ कि.ग्रॅ.)

### ७.४ लेखी चाचणी पुढील प्रमाणे राहील :

(१) अंकगणित (२) सामान्यज्ञान व चालू घडामोडी (३) मराठी भाषेत निबंध लेखन. सदर चाचणीतील उत्तरपत्रिका मराठीमध्ये (देवनागरी लिपीत) लिहिणे उमेदवारास बंधनकारक राहील. लेखी चाचणीची प्रश्नपत्रिका मराठीमध्ये असेल.

७.५ **मुलाखत चाचणी :—**

मुलाखत चाचणीमध्ये खालील विषयांचा समावेश असेल:

१) उमेदवारांचे सर्वसाधारण व्यक्तिमत्व
२) क्रिडा
३) एन.सी.सी.
४) इतर विशेष कार्यक्षमता उदा. वाहन चालविण्याचे ज्ञान, संगणक हाताळण्याचे ज्ञान अथवा अन्य तांत्रिक विषयावरील प्रशिक्षण/उच्चशिक्षण.
जे उमेदवार जड वाहन किंवा हलके वाहन चालक परवानाधारक असतील त्यांना गुण देताना त्याप्रमाणे गुण देण्यात येतील.

७.६ **वैद्यकिय चाचणी :—**

सर्व चाचण्यांत उत्तीर्ण होऊन अंतिमत: निवड यादीत समावेश असलेल्या उमेदवारांची विहीत नियमानुसार शासकीय वैद्यकिय अधिकाऱ्यामार्फत वैद्यकीय चाचणी घेण्यात येईल. वैद्यकिय चाचणीत अपात्र ठरलेले उमेदवार नियुक्तीस अपात्र ठरतील.

## ८. महिलांसाठी आरक्षण :

शासन नियमाप्रमाणे महिलांसाठी ३०% इतके समांतर आरक्षण असून एखाद्या प्रवर्गात त्या प्रमाणात महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास सदर रिक्त पदे पात्र पुरूष उमेदवारांमधून भरण्यात येतील.

## ९. गृहरक्षक (होमगार्ड) आरक्षण :

एकूण पदांच्या ५% इतके समांतर आरक्षित पदे गृहरक्षक दलातून भरण्यात येतील. उमेदवाराची भरतीच्या दिनांकापर्यंत म्हणजेच दिनांक ०८/०३/२०१० रोजी पर्यंत गृहरक्षक दलामध्ये कमीत कमी ३ वर्षे सेवा पूर्ण झालेली असणे आवश्यक आहे. याबाबतचे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ देय होणार नाही.

## १०. माजी सैनिक आरक्षण :

एकूण पदांच्या १५% इतके समांतर आरक्षित पदे ही माजी सैनिकांतून भरण्यात येतील. तसेच त्यांच्या वयामध्ये, त्यांची सैन्यदलात जितकी सलग सेवा (६ महिन्यांपेक्षा कमी नाही) झाली असेल तेवढी वर्षे अधिक ३ वर्षे इतकी सवलत देय राहील. म्हणजेच माजी सैनिकाची सैन्यदलात जितकी सेवा (६ महिन्यांपेक्षा कमी नाही) असेल तेवढी वर्षे अधिक ३ वर्षे सध्याच्या वयातून वजा जाता येणारे वय त्या त्या प्रवर्गातील वयोमर्यादेत आवश्यक. याबाबतचे सक्षम प्राधिकरणाचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल. अन्यथा सदर आरक्षणाचा लाभ देय होणार नाही.

## ११. प्रकल्पग्रस्त / धरणग्रस्त आणि भूकंपग्रस्त आरक्षण :—

एकूण पदांच्या ७% ( **महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक भूकंप—१००९/प्र.क्र.—२०७/१६ अ, दिनांक २७/०८/२००९ अन्वये ५% धरणग्रस्त/**

**प्रकल्पग्रस्त आणि २% भूकंपग्रस्त उमेदवारांसाठी राखीव राहतील)** इतके समांतर आरक्षित पदे धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त आणि भूकंपग्रस्त प्रवर्गातून भरण्यात येतील. शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती सदर उमेदवारांना पोलीस भरतीच्या वेळी देय राहतील.

## १२. खेळाडू उमेदवार :

१२.१ प्रवर्गनिहाय ५% पदे खेळाडू उमेदवारातून भरण्यात येतील. खेळाडूंबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सवलती व निर्देशांनुसार सदरची पदे भरण्यात येतील. सदरची सूट फक्त खाली नमूद क्रिडा कामगिरी करणाऱ्या खेळाडूंसाठीच देय राहील.

(१) राज्यस्तर (आंतर जिल्हा) पदक विजेता (२) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तर प्रतिनिधित्व (३) राष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व आणि (४) आंतरराष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व

१२.२ त्यासाठी त्यांना त्यांची (१) राज्यस्तर (आंतर जिल्हा) पदक विजेता (२) अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तर प्रतिनिधित्व (३) राष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व आणि (४) आंतरराष्ट्रीय स्तर प्रतिनिधित्व खेळातील कामगिरीविषयक प्रमाणपत्रे **संचालक, क्रिडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून प्रमाणित करून घ्यावी लागतील** व त्या प्रमाणित प्रमाणपत्राच्या छायांकित प्रती खेळातील कामगिरीविषयक प्रमाणपत्रांसह सादर कराव्या लागतील.

१२.३ **खेळाडूंच्या प्रमाणपत्रांचा दर्जा केवळ क्रिडा संचालनालयाकडून (त्यांच्या प्रतिनिधींकडून नव्हे) तपासून घेणे आवश्यक आहे. अन्य कोणत्याही प्राधिकाऱ्याकडून तपासून घेतलेले खेळाचे प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार नाही.**

**खेळांची नावे :**

| | | |
|---|---|---|
| १) आर्चरी (धनुर्विद्या) | २) ॲथलेटिक्स व क्रॉस कन्ट्री | ३) ॲक्वेटिक्स (पाण्यातील खेळ) |
| ४) बॅडमिंटन | ५) बॉक्सिंग | ६) बास्केटबॉल |
| ७) जिम्नॅस्टिक्स | ८) हॅण्डबॉल | ९) खो खो |
| १०) ज्युडो | ११) कबड्डी | १२) रोविंग |
| १३) लॉन टेनिस | १४) शुटींग | १५) वेटलिफ्टिंग |
| १६) टेबल टेनिस | १७) व्हॉलिबॉल | १८) तायक्वांदो |
| १९) कुस्ती | २०) हॉकी | २१) बिलीयर्डस व स्नूकर |
| २२) फुटबॉल | २३) कराटे | २४) पॉवर लिफ्टिंग |
| २५) बॉडी बिल्डिंग | २६) क्रिकेट | २७) कॅनोईंग—कयाकिंग (होडी वल्हविणे) |
| २८) रग्बी | | |

१२.४ पुरूष व महिला खेळाडूंना किमान उंचीच्या अटीमध्ये २.५ से.मी इतकी सूट देय राहील.

## १३. <u>अर्जदारांसाठी आवश्यक सूचना :—</u>

अर्जदाराने अर्जासोबत खालील प्रमाणपत्रांच्या (लागू असलेल्या) सुस्पष्ट दिसतील अशा सक्षम प्राधिकाऱ्याने साक्षांकित केलेल्या छायांकित प्रती (**attested xerox copies**) जोडणे आवश्यक आहे.

i) शाळा सोडल्याचा दाखला किंवा जन्माचा दाखला.

ii) शैक्षणिक पात्रतेचे प्रमाणपत्र, गुणपत्रक.

iii) जातीचे प्रमाणपत्र

iv) सामान्य प्रशासन विभाग शासन परिपत्रक क्रमांक बीसीसी—२००९/प्र.क्र.—२९१/०९/१६ ब, दिनांक ०५/११/२००९ नुसार मागासवर्ग उमेदवाराने **जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate)** सादर करणे आवश्यक राहील. **<u>अर्जदारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय त्यांना नियुक्ती देण्यात येणार नाही.</u>**

v) प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त/भूकंपग्रस्त असल्यास संबंधित जिल्हाधिकारी / जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे प्रमाणपत्र. या प्रमाणपत्रावर उमेदवारांचे नाव असणे आवश्यक आहे.

vi) अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र. **(सामान्य प्रशासन विभागाने शासन निर्णय क्रमांक डीएमसी—१०८७/९६९८/६०८—३२, दि.१/३/१९८९ अन्वये विहीत केलेल्या नमुन्यातीलच अधिवास (डोमिसाईल) प्रमाणपत्र वैध राहिल.) (पहा परिच्छेद ६.५ )**

vii) सामाजिक न्याय विभागाने निश्चित केलेले निकष व अटीनुसार उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन–क्रिमीलेयर) निकटतम वर्षाचे प्रमाणपत्र. **(दिनांक ०१/०४/२००८ ते ३१/०३/२००९ या कालावधीचे प्रमाणपत्र म्हणजेच दिनांक ०१/०४/२००९ व त्यानंतर दिलेले)** सदरचे प्रमाणपत्र शासनाने विहीत केलेल्या नमुन्यातच असणे आवश्यक आहे. (दिनांक ०१/०४/२००९ ते ३१/०३/२०१० या वित्तीय वर्षासाठी भरतीच्या तारखेच्या पूर्वीचे म्हणजेच दिनांक ०८/०३/२०१० पूर्वी दिलेले नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र सादर केल्यास ते सुद्धा ग्राह्य धरण्यात येईल). तसेच सदर प्रमाणपत्र भरतीच्या तारखेच्या अगोदरचे म्हणजेच दिनांक ०८/०३/२०१० पूर्वीच्या तारखेचे असणे आवश्यक आहे.

viii) विविध आरक्षण प्रवर्गात मोडणाऱ्या उमेदवारांनी संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र.

ix) रोजगार व स्वयंरोजगार कार्यालयात नावनोंदणी केली असल्यास सदर कार्यालयाने दिलेले व सन २००९—२०१० साठी नूतनीकरण केलेले प्रमाणपत्र

**१४.** पोलीस भरतीतील प्रत्येक प्रक्रियेबाबत निवड समितीचा निर्णय अंतिम राहील. याबाबत उमेदवाराने कोणत्याही माध्यमाद्वारे दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्यास भरती प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

**१५.** पोलीस भरती प्रक्रियेच्या दरम्यान उमेदवारास कोणतीही शारिरीक इजा/नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

**१६.** भरती प्रक्रियेमध्ये कोणत्याही प्रकारची वशिलेबाजी किंवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास अपात्र ठरविण्यात येईल.

**१७.** सदर पोलीस भरतीची माहिती **www.maharashtra.gov.in / www.mahapolice.gov.in / www.mumbaipolice.org** आणि **www.mumbaitrafficpolice.org** या संकेत स्थळावर तसेच पोलीस मुख्यालयातील नोटीस बोर्डावर उपलब्ध राहील.

**१८.** निवड झालेल्या उमेदवारांची बृहन्मुंबई पोलीस दलात नियुक्ती झाल्यानंतर त्यांना मुंबई पोलीस दलाबाहेर बदलीकरीता किमान ६ वर्षे कोणत्याही कारणांसाठी अर्ज करता येणार नाही.

**१९.** पोलीस भरती प्रक्रिया सुरू झाल्यानंतर उमेदवाराने अर्जात व अर्जासोबतच्या कागदपत्रांमध्ये दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल. तसेच चुकीच्या माहितीच्या आधारे नियुक्ती झाल्यास, सदर नियुक्ती कोणतीही कारणे न देता संपुष्टात आणण्यात येईल. तसेच ते फौजदारी कारवाईस सुध्दा पात्र ठरतील.

**( डॉ. शशिकांत महावरकर )**
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय—२,
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांच्याकरिता

(सोबत ३ नमुने जोडण्यात आले असून ते
प्रसिद्ध करावयाचे आहेत.)

[पहा परिच्छेद क्र. ६.५]

**शा.नि.,सा.प्र.वि.,क्र.डीएमसी—१०८७/९६९८/६०८—बत्तीस, दि.०२.०१.८९**

**वय, राष्ट्रीयत्व व अधिवास प्रमाणपत्र**

**CERTIFICATE OF AGE, NATIONALITY, DOMICILE**

**(महाराष्ट्र राज्यातील प्राधिकाऱ्यांनी दिलेले) (Issued by Authorities in the State of Maharashtra)**

खाली नमूद केलेले प्रमाण सादर केल्यानंतर, याद्वारा प्रमाणित करण्यात येत आहे की,

On submission of the proof noted below, it is hereby certified that

श्री./श्रीमती/कुमारी ..........................................................................................................................

(ठळक अक्षरात लिहावे, आडनाव असल्यास, ते अधोरेखित करावे)

Shri/Shrimati/Kumari ………………………………………………………………………………..

(in block capitals[ underline the surname if any)

यांचा जन्म दिनांक माहे सन एकोणीसशे

रोजी भारताच्या किंवा च्या राज्यक्षेत्रातील राज्य

येथे झाला.

Was born on the day of in the

Year one thousand nine hundred and

at in the State of

within the territory of India or of

ते/त्या भारताचे/भारताच्या नागरिक आहेत. that he/she is a CITIZEN OF INDIA ;

ते/त्या महाराष्ट्र राज्याचे/राज्याच्या अधिवासी आहेत. (आवश्यक असल्यास, कारणाचा निर्देश करावा)

that he/she is domiciled in the State of Maharashtra (*add, if necessary*) by reason of;

---

— २ —

सादर केलेल्या प्रमाणांचा तपशील

PARTICULARS OF PROOFS SUBMITTED

(अ) प्रश्नावलीच्या विहित नमुन्यावर अर्जदाराने दिलेली उत्तरे

(A) Answers given by the Applicant on the prescribed Form of the Questionnaire

(ब) यांनी दिलेले जन्म, बाप्तिस्मा, मॅट्रिक किंवा शाळा सोडल्याचे किंवा तत्सम प्रमाणपत्र.

(B) Birth/Baptism/Matriculation or School Leaving or a like Certificate issued by;

(क) पुढील व्यक्तीची शपथपत्रे किंवा प्रतिज्ञापत्रे :—

(C) Affidavit or Declarations of :-

(ड) इतर प्रमाण

(D) Other Proof

ठिकाण दिनांक माहे सन २०

Dated at this day of 20

सील
Seal

मुख्य महानगर दंडाधिकारी
——————————— } यांजकडून प्राधिकृत दंडाधिकारी
जिल्हा दंडाधिकारी

Magistrate authorized by the { Chief Metropolitan Magistrate, ------
--------------------------------------------
District Magistrate

**(शासन निर्णय महिला व बालविकास विभाग क्र.८२/२००१/मसेआ—२०००/प्र. क्र.४१५/का—२, दि.२५ मे २००१ चे परिशिष्ट — ३)**

## परिशिष्ट—३

खुल्या प्रवर्गातील महिलांकरिता शासकीय, निमशासकीय व शासन अनुदानित संस्थांमध्ये ठेवण्यात आलेल्या ३० टक्के आरक्षणाच्या सवलतीकरिता उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) यामध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना :—

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शासन निर्णय, महिला व बाल विकास विभाग क्रमांक संकीर्ण—२०००/प्र.क्र.४१५/का—२, दिनांक २२ मे २००१ अन्वये विहित केलेल्या खुल्या प्रवर्गातील महिलांकरिताच्या उन्नत व्यक्ती / गट ( क्रिमीलेअर ) प्रवर्गामध्ये कुमारी / श्रीमती ................................................. यांच्या कुटुंबियांचे लगतच्या मागील ३ वर्षाचे सर्व मार्गांनी मिळून एकूण उत्पन्न वार्षिक सरासरी रूपये ....... लाखाच्या आत असल्याने त्या खुल्या प्रवर्गातील उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नाहीत.

**सही**

**( सक्षम अधिकारी )**

**ठिकाण :**

**दिनांक :**

**शिक्का :**

**खुल्या प्रवर्गातील उच्चतम गुणवत्ताधारक खेळाडुंना शासकिय / निमशासकिय व इतर क्षेत्रात नोकरीसाठी ५ टक्के आरक्षणाच्या सवलतीसाठी उन्नत व्यक्ती/गट ( क्रिमीलेअर ) यामध्ये मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा नमुना**

## शासन निर्णय

1- शासन निर्णय क्र.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक राक्रिधो –२००२/प्र.क.६८/क्रियुसे २ दिनांक ३० एप्रिल २००५
2- शासन निर्णय क्र.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक राक्रिधो –२००२/प्र.क.६८/ क्रियुसे २ दिनांक २१ जुन २००६
3- शासन निर्णय क्र.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक राक्रिधो –२००२/प्र.क.६८/ क्रियुसे २ दिनांक १८ नोव्हेंबर २००६
4- शासन निर्णय क्र.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक संक्रिआ/१००६/(प्र.क.१८२ /०६) क्रियुसे २ दिनांक ०६ मे २००८
5- शासन निर्णय क्र.शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्रमांक संक्रिआ/२००७ /(प्र.क.३२९/०७) क्रियुसे २ दिनांक ११ जुलै २००८
६. शासन निर्णय सीबीसी–१०/२००६प्र.क. १२२/मावक ५ दिनांक २० ऑक्टोबर २००६

## <u>प्रमाणपत्र</u>

प्रमाणित करण्यात येते की, श्री ....................................... रा. ........................................................................ हे खुल्या प्रवर्गातील खेळाडू असुन त्या/ते उन्नत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) मध्ये मोडत नाहीत. नियुक्ती देणाऱ्या संबंधीत विभागाने खेळाडू बाबतची अर्हता शासन निर्णय दि. ३०/०४/०५ नुसार तपासावी.

**हे प्रमाणपत्र दि. ...../...../........ पर्यत वैध राहील.**

ठिकाण :–

दिनांक :–

**जिल्हाधिकारी / उपजिल्हाधिकारी**
( सक्षम प्राधिकारी )